॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२३-२४/४४७३ दिनांक : २९/०४/२०२४

# :: महत्वाचे परिपत्रक ::

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ प्रमाणे नियोजीत **Last Working Day** दिनांक ०१/०५/२०२४ आहे. परंतु उन्हाळी-२०२४ पदवी, पद्व्युत्तर पदवी व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेतील उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन व नियमन कालमर्यादित व तातडीने करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने विहीत कालावधीमध्ये निकाल घोषीत करणे आवश्यक असल्यामुळे मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ चे **Last Working Day** मध्ये दिनांक ०१/०५/२०२४ ऐवजी १०/०५/२०२४ असा बदल करून एकुण दहा दिवसाच्या उन्हाळी सुट्टया पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. उन्हाळी सुट्टयाचा कालावधी ११/०५/२०२४ ते २४/०६/२०२४ असा राहील.

वाढविण्यात आलेला सदर दहा दिवसाचा कालावधी केवळ उन्हाळी-२०२४ परीक्षेतील उत्तरपुस्तिका मूल्यांकनाच्या कार्यासाठी उपयोगात यावा या उद्देशानेच वाढविण्यात आलेला आहे. त्यामुळे या कालावधीमध्ये सर्व मान्यताप्राप्त शिक्षक यांनी विद्यापीठाच्या कोणत्याही स्वतंत्र आदेशाची वाट न पाहता /प्राचार्यांच्या कार्यमूक्तीची वाट न पाहता आपणास नेमून दिलेल्या व सोईच्या मूल्यांकन केंद्रावरती पूर्णवेळ उपस्थित राहून मूल्यांकनाचे कार्य पूर्ण करावे. या कालावधीमध्ये प्राचार्यांनी संबंधीत शिक्षकास परीक्षेच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी महाविद्यालयात थांबवून घेवू नये. त्याअनुषंगाने सदर बदलाची नोंद घेवून उन्हाळी-२०२४ परीक्षेतील उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन व नियमन पुर्ण करून घेण्यात यावे.

सबब, वरीलप्रमाणे आदेशाचे पालन न करणा-या प्राचार्य/शिक्षक व इतर अधिकारी/कर्मचारी यांच्यावरती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार कडक कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधीतांनी गांभीर्यांनी नोंद घ्यावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**
मा.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:**
१) मा.संचालक, विद्यापीठ परिसर/उपपरिसर, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, दिनांक ०२/०५/२०२४ ते १५/०६/२०२४ (३५ दिवस) या दरम्यान सोईप्रमाणे सुट्या उपभोगण्याबाबतची कार्यवाही करावी.
२) मा.समन्वयक, जिल्हा/तालुका मूल्यांकन केंद्र, उन्हाळी-२०२४ यांना देवून कळविण्यात येते की, उपरोक्त सदरील परिपत्रकाच्या अनुषंगाने उपस्थित शिक्षकाकडून मूल्यांकनाचे कार्य पूर्ण करून घेण्यात यावे. तसेच उपस्थित असलेल्या शिक्षकांची उपस्थिती व एकुण उत्तरपुस्तिकांची मूल्यांकन केल्याची संख्या याबाबतचा सविस्तर अहवाल विद्यापीठास सादर करावा ही विनंती.